N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** धुळे  **P.S.(ठाणे):** देवपूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0174  **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 12/05/2026 20:13

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार  **Date From (दिंनाक पासून):** 12/05/2026
   **Time Period (कालावधी):** पहर 4  **Date To ( दिंनाक पर्यंत):** 12/05/2026
   **Time From (वेळेपासून):** 10:57 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 12/05/2026  **Time (वेळ):** 20:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 039

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 12/05/2026 20:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 2 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती ,धुळे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.यशवंत बोरसे पोलीस निरीक्षक

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रविभाग, धुळे ,देवपूर,धुळे,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रविभाग, धुळे ,देवपूर,धुळे,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527427065

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विश्वजित संजय भामरे | | | 1. प्लट नं 01, भरत नगर,,नकाणे रोड, धुळे,,देवपूर,धुळे,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपये दरच्या 14 चलणी ना ेटा | 7,000.00 |

**10. Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

7,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मी यशवंत विश्वनाथ बोरसे, वय 38 वर्षे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, धुळे

समक्ष पोलीस स्टेशनला हजर राहुन फिंयाद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे पोलीस निरीक्षक या पदावर सुमारे आठ महिन्यापासुन कार्यरत आहे. दि.12.05.2026 रोजी आम्ही दैनंदिन कर्तव्यावर हजर असतांना तक्रारदार मधुकर हिम्मतराव पाटील यांनी कार्यालयात येवुन त्यांच्याकडे तांत्रिक सहायक विश्वजित भामरे हे लाचेची मागणी करीत असल्याचे सांगितल्याने आम्ही मा. कार्यकारी अभिंयता, महावितरण शहर तथा ग्रामीण विभाग, धुळे यांना पत्र देवुन त्यांचेकडील श्री शेख अनीस शेख गनी अन्सारी, मुख्य तंत्रज्ञ व श्री भालचंद्र एकनाथ वानखेडकर, मुख्य तंत्रज्ञ यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले. तेव्हा आम्ही त्यांना आमची ओळख देवुन त्यांची ओळख करुन घेतली. तसेच कार्यालयात हजर असलेले तक्रारदार मधुकर हिम्मतराव पाटील, पोकॉ. मकरंद पाटील यांची ओळख करुन दिली.

त्यानंतर आम्ही तक्रारदारास त्यांचे नांव गांव विचारता त्यांनी त्यांचे नांव मधुकर हिम्मतराव पाटील, वय 70 वर्षे, व्यवसाय शेती, रा. नंदाळे बुद्रुक ता.जि. धुळे. ह.मु. प्लॉट नं.7, प्रसन्न हौसिंग सोसायटी, जमनागिरी रोड, गोळीबार टेकडी रोड, धुळे असे सांगुन त्यांनी त्यांचे तक्रारीची तोंडी हकीगत सांगितली, त्यानंतर तक्रारदार यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांची तक्रार टंकलिखित करुन घेण्यात आली ती ''माझा भाऊ प्रभाकर हिंमतराव पाटील व वहिनी सौ. आशाबाई प्रभाकर पाटील यांचे नावे नंदाळे बु. गावाचे शिवारात गट नं. 226/2/अ/2 शेत जमिन आहे. सदर शेतजमीनी मध्ये माझी वहिणी सौ. आशाबाई प्रभाकर पाटील यांचे नांवे महाराष्ट्र शासनाच्या महात्मा ग्रांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत सन 2023 - 24 या वर्षात विहिर खोदण्यासाठी एकुण 3,99,610/- रु. मंजुर झाले आहेत. माझया भावाचे मुले हे पुणे येथे नोकरीस असल्याने भाऊ व वहिनी हे पुणे येथेच वास्तव्यास आहेत. माझी शेती भावाच्या शेतजमीनीलगत असल्याने मी भावाची व माझी शेती करुन भावास त्यांचा हिश्यातील उत्पन्न देतो.

सदर मंजुर झालेल्या विहिर अनुदानापैकी 2,39,000/- रुपये माझया वहिणीस अदा झाले आहे. सदर विहीरीचे काम पुर्ण झाले असुन झालेल्या कामाच्या उर्वरीत अनुदानाची रक्कम मिळणे बाकी आहे. माझया भावाची शेती मी कसत असल्याने भावाने विहिरीचे अनुदान मिळणेकरीता पाठपुरावा करणेबाबत मला सांगितले आहे. त्याप्रमाणे मी दि.05/05/2026 रोजी पंचायत समिती, धुळे कार्यालयातील तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांना भेटलो असता त्यांनी खाजगी ऑपरेटर कडुन काम करुन घेण्यासाठी माझे कडुन 500/- रुपये घेतले व मला ''तुमच्या वहिणीच्या विहिरीचे मोजमाप करुन झालेल्या कामाचे 1,50,000/- रुपयांचे मुल्यांकन मोजमाप पुस्तिकेत नोंदविले आहे, ती मोजमाप पुस्तिका तपासणीकरीता पुढे पाठविण्यासाठी शाखा अभिंयता व उपअभिंयता यांचेकरीता 7,000/- रुपये माझयाकडे द्यावे लागतील, त्याशिवाय मी मोजमाप पुस्तिका पुढे पाठविणार नाही'' असे मला सांगितले आहे. तेव्हा मी त्यांना आता माझयाकडे पैसे नाहीत. पैसे जमा झाल्यावर तुम्हाला भेटण्यास येतो'' असे सांगुन लाच मागणी केल्याची लेखी तक्रार दिली. सदर तक्रार वाचुन तक्रारी अर्जावर आम्ही व दोन्ही पंचांनी सहया केल्या आहेत. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांशी चर्चा करुन तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्याचा निंणय घेतला. आम्ही तक्रारदार व दोन्ही पंचांना पडताळणी कार्यवाहीबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोकॉ. मकरंद पाटील यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन तक्रारदार यांच्याकडे देवुन तक्रारदार व पंच नं. 01 शेख अनीस शेख गनी अन्सारी अशांना तक्रारदार यांच्या मोटार सायकलने तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांची भेट घेण्यासाठी धुळे पंचायत समिती कार्यालयात रवाना केले. त्यानंतर काही वेळाने तक्रारदार व पंच नं. 01 शेख अन्सारी असे धुळे ला.प्र.वि. कार्यालयात परत आले. तेव्हा पंच नं. 01 शेख अन्सारी यांना विचारणा केली असता त्यांनी ''मी व तक्रारदार असे आपल्या पासुन तक्रारदार यांच्या मोटार सायकलने रवाना होवुन धुळे पंचायत समिती कार्यालयात गेलो. तेथे वरच्या मजल्यावरील लघुसिंचन विभागात समोर खुर्चीवर बसलेल्या इसमाकडे इशारा करुन ते विश्वजित भामरे असल्याचे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी विश्वजित भामरे यांची भेट घेतली. तेव्हा

त्यांच्यात तक्रारदार यांच्या वहिणीच्या विहिरीच्या प्रकरणाबाबत चर्चा झाली. तेव्हा तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांनी तक्रारदार यांच्याकडे मोजमाप पुस्तिका पुढे पाठविण्यासाठी कार्यालयातील वरिष्ठासह पाच ते सहा जणांना एकुण 7,000/- रुपये द्यावे लागतील, तसेच त्यांनी स्वत:करीता ''इच्छे प्रमाणे द्या'' असे सांगुन तक्रारदार याचेकडुन लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. तेव्हा तक्रारदार यांनी अर्ध्या तासात पैसे घेवुन येतो असे सांगितले. त्यानंतर आम्ही आपणाकडे परत आलो'' अशी हकिगत सांगितली. तसेच तक्रारदार यांनी देखील पंच नं. 01 शेख अन्सारी यांचे सांगणेप्रमाणेच हकिगत सांगितली. सदरची हकिगत व डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मधील ध्वनीमुद्रित झालेले संभाषण ए◌ेकुन आमची व पंचांची तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याची खात्री झाली.

त्यानंतर आम्ही तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांचेवर सापळा लावण्याचा निंणय घेतला. तेव्हा तक्रारदार यांनी सापळा कारवाईकामी दिलेले 7,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 14 नोटांना पावडर लावुन सापळापुर्व कार्यवाही करुन लाचेची रक्कम तक्रारदार यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर आम्ही तक्रारदार व पंचांना सापळा कारवाईबाबत सुचना देवुन तक्रारदार यांच्याकडे डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन देवुन तक्रारदार व पंच नं. 01 शेख अन्सारी अशांना तक्रारदार यांच्या मोटार सायकल क्रमांक एम.एच.18 बीयु 6827 ने धुळे पंचायत समिती कार्यालयात रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही, पंच नं. 2, पोहेकॉ. राजन कदम, पोहेकॉ. मुकेश अहिरे, पोकॉ. मकरंद पाटील असे खाजगी वाहन क्रमांक एम.एच.15 केजी 5114 ने जावुन धुळे पंचायत समिती कार्यालयाचे परिसरात वाहन थांबवुन आजुबाजुस सापळा लावला. काही वेळाने तक्रारदार यांनी कार्यालयाचे बाहेर येवुन ठरवुन दिलेला इशारा केला. तेव्हा सापळा पथक त्यांचेजवळ पोहोचलो. तेव्हा पोकॉ. मकरंद पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केले. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 यांना विचारणा केली. तेव्हा पंच नं. 1 यांनी कार्यालयात समोरच उभे असलेल्या इसमाकडे इशारा करुन ते विश्वजित भामरे असल्याचे सांगितले. तक्रारदार यांनी तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांची भेट घेतली, तेव्हा त्यांच्यात चर्चा झाली. तेव्हा भामरे यांनी त्यांच्या समोरील टेबलचा ड्रॉवर उघडुन तक्रारदार यांना त्यामध्ये पैसे टाकण्यास सांगितले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांच्या पॅन्टच्या उजव्या खिशातील लाचेची रक्कम काढुन भामरे यांच्या सांगण्याप्रमाणे त्यांच्या समोरील टेबलाच्या ड्रॉवर मध्ये लाचेची रक्कम ठेवली. तेव्हा भामरे यांनी ड्रॉवर लावुन घेतले. त्यानंतर तक्रारदार यांनी ठरवुन दिलेला इशारा केला''. अशी हकिगत सांगितली. त्यानंतर आमचे सुचनेवरुन पोहेकॉ. राजन कमद यांनी विश्वजित भामरे यांना त्यांचे मनगटापासुन हात धरुन त्यांना अटकावुन ठेवले. तेव्हा पंच नं. 02 यांचेकरवी तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांचे टेबलाच्या ड्रॉवरमधील लाचेची रक्कम काढुन हस्तगत करण्यात आली. त्यानंतर आम्ही पुढील संपुर्ण कार्यवाही धुळे ला.प्र.वि. कार्यालयात जावुन करण्याचा निंणय घेवुन आम्ही सर्वजण तेथुन रवाना होवुन ला.प्र.वि. धुळे कार्यालयात येवुन तेथे आलो. तेथे कार्यालयात तक्रारदार व पंच नं. 02 यांच्या हातावर ऍ◌न्थ्रा◌ासिन पावडरची अल्ट्राव्हायलेट दिव्याची तपासणी केली. तसेच तांत्रिक सहायक विश्वजित भामरे यांचेकडुन हस्तगत केलेल्या नोटांची तपासणी करण्यात आली. तसेच लाचेची रक्कम ठेवलेल्या ड्रॉवरच्या पृष्ठभागावर लाचेच्या रकमेची लागलेली ऍ◌न्थ्रासिन पावडर पुसलेला कापसाचा बोळ्याची तपासणी केली. त्यानंतर तक्रारदार यांच्या तक्रारीवरुन झालेल्या संपुर्ण कार्यवाहीचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.

अशा प्रकारे तक्रारदार मधुकर हिम्मतराव पाटील यांच्या वहिणीच्या विहिरीचे उर्वरीत अनुदान मिळण्याकरीता कामाचे मुल्यांकन केलेली मोजमाप पुस्तिका पुढे पाठविण्यासाठी लोकसेवक विश्वजित संजय भामरे, तांत्रिक सहायक (बाहयास्त्रोत), पंचायत समिती, धुळे, रा. प्लॉट नं. 01, भरत नगर, नकाणे रोड, धुळे यांनी पंचायत समिती कार्यालयातील वरिष्ठासह 5 ते 6 जणांकरीता 7,000/- रुपये व स्वत: करीता ''इच्छे प्रमाणे द्या'' अशी तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करुन लाच स्विकारण्याचे मान्य केले. आज दि.12.05.2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान धुळे पंचायत समिती कार्यालयाचे लघुसिंचन विभागात 12:45 वाजता 7,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारुन त्यांनी स्वत:चे आर्थिक फायद्यासाठी भ्रष्ट व बेकायदेशिर मार्गाचा अवलंब करून अनाधिकाराने पदाचा दुरूपयोग केला म्हणुन त्यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम सन 1988 चे कलम 7 व 7-अ प्रमाणे माझी कायदेशिर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Samadhan Mahadu Wagh(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Samadhan Mahadu
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अमलदार
देवपूर पोलीस स्टेशन